# पाणी काढणारे लोक

पिवळ्या, कोरड्या नदीपात्रात
खड्डे खणून
पाणी काढणारे लोक

जसे
सुरकुतल्या, ओघळत्या
लोंबत्या स्तनातून
जीव खाऊन
पाणी शोषणारे तान्हे पोर

आपली आई मरून गेलीय
हे पोराला कळतं नाही
तसंच
त्या पाणी उकरणाऱ्या
माणसांना ही....

– अनिल अवचट